**प्रभु तरुण आश्रयदाते**

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

**प्रभु तरुण आश्रयदाते**

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

वर्ष ८८ वे) प्रभुतरुण मुंबई, गुरुवार, ता. १६ माहे फेब्रुवारी, सन २०१२ (अंक ९८९

*संपादकीय*

## सगळी फुलं...गजरा झाली

—सुहासिनी कीर्तिकर

दरवेळी माझ्याकडे इंदुरहून 'हायकूपत्रिका' येते. शांताबाई शेळके यांनी जपानी हायकूंचे फारच सुरेख अनुवाद केले होते. शिरीष पै या तर स्वत:च्या अलवार हायकूंसाठी आपल्या अगदी ओळखीच्या आहेत.
'आभाळात पाखरू

आकाशभर उडाले; सावलीवरून कळले'अशा त्यांच्या हायकू त्यांच्याच भावपूर्ण आवाजात ऐकताना शेवटच्या ओळीची गंमत कळायची. चारोळीबिरोळीपेक्षाही अधिक सशक्त अर्थ घेऊन वावरणारी हायकूची शेवटची ओळ म्हणजे आधीच्या दोन ओळींना तोलून धरत एक वळणदार गिरकी घेत वेगळेच घटित सांगणारी. वरवर पहाता हा 'तीनोळी' प्रकार सोपा वाटतो. (अर्थात् दुसऱ्याने काही चांगले केले की ते सोपेच वाटते म्हणा!) हायकूवरून खरंच 'तीनोळी' हा काव्यबंधही आपल्याकडे आता जम बसवून आहे. कविता महाजन अशा सुंदर 'तीनोळी' लिहिते.

'वाळले पान
गरगरत आलेऽ
फूलपाखरूच वाटले'- अशा. अनुपमा उजगरेही लिहिते. या तीनोळीपेक्षा हायकूला अटकर बांधा आहे. अक्षरसंख्येचे बंधन आहे. पाच, सात, पाच असे अक्षरांचे बंध त्यात असतात. या बंधनामुळेच तर शेवटची ओळ कवितेच्या अर्थाला भावसुंदर करते. कधी संगती दाखवून. तर कधी विरोधाभास दाखवून. विरोधाभास कसा? पहा हं!
'फर्निचर
भरलेले हे घर
किती रिकामे'- म्हणजे फर्निचर आहे पण घरपण हरवलेय. किंवा मग त्यात माणसांचा वावरच नाही. हे 'रिकामे घर' वाचताना आपल्या मनात पक्के घर करते. हायकूमधील संगती तर अनेकवेळा आपल्या मनातील गुंत्याची संगती लावत जाते. निसर्गाशी असलेले माणसाचे नाते, 'बिंब प्रतिबिंब' न्यायाने त्यात येत रहाते. 'पाऊस पडतोय
कुणीतरी झेलाऽ लागेल त्याला' यात पावसाशी असलेले 'ओले' नाते 'लागेल त्याला' मधून चिंब चिंब होते अन् 'कुणीतरी' आपणच मनोमन बनतो. असे झाले तरच तो खरा 'हायकू' बनतो. गंमत म्हणजे आपण 'ती' कविता म्हणतो. केशवसुतां-पासून कितीतरी कवींनी या कवितेला 'काव्यसुंदरी' मानून म्हणूनच ना; प्रेमयाचना केली आहे? म्हणूनच कविता काय; किंवा 'काव्यप्रतिभा' काय; स्त्रियांसारख्या चंचल वृत्तीच्या मानल्या आहेत.तिची आराधना करावी लागते. तिचा अनुनय करावा लागतो. तिच्याशी लडिवाळपणे खेळावे, हसावे, रूसावे लागते. कविताकामिनी तशी लहरीच. पण 'हायकू' मात्र 'तो' हायकू! आपला मित्रच जसा. त्याच्याशी लडिवाळ चाळे करावे लागत नाहीत. अनुनय तर मुळीच नाही. कारण मित्राने अचानक पाठीमागून येऊन पाठीवर थाप मारावी आणि 'काय कसं काय?' विचारावं; त्यामुळे 'अचानकतेचा' प्रवाह रक्तात भिनून आनंदाने अलगद् आतून उसळी घ्यावी तसा 'हायकू' भेटतो. तो रुसत नाही. कधी कधी तर दिवसभराच्या रामरगाड्यात तो अवतीभोवती

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## बडे अच्छे लगते हैं... ये अवार्ड्स!!!

—संजना कोठारे



संगीता आशिष राव

पहायला गेलं तर हे जग म्हणजे माणसांचं रान आहे आणि ह्या रानात आपल्या अवतीभोवती आहे तो किलबिलाट. जो आपल्याला प्रकर्षाने जाणवत असतो की आपण एकटे नाही, परंतु आपल्या आजुबाजूला एवढे जीव असूनसुद्धा आपण दुर्लक्ष करतो. आपल्या अवतीभोवती केवळ माणसांचाच नव्हे तर प्राण्यांचा, पक्षांचा आणि इतर बऱ्याच जीवांचा आवाज आणि गोंगाट ऐकण्यात येतो. अशा गजबजलेल्या वातावरणात कोणी एकटं कसा असू शकतं? सतत कोण न् कोणीतरी असतंच आपल्या आजुबाजूला. आपल्याला वाटतं की एखादी व्यक्ती आपल्या जवळ नाही तर आपण एकटे आहोत. परंतु तसा आपला केवळ समज आहे. पहायला गेलं तर बरंच काही आहे आणि पहायला गेलं तर काहीच नाही.माणसं असूनसुद्धा नसल्यासारखी आणि नसूनसुद्धा असल्यासारखी. जी व्यक्ती माणसांच्या घोटाळ्यात सतत वावरत असते ती एकटी नसते कशावरून? केवळ सुख सोहळ्यात साथ देणारे आपले सखेसोयरे नाही तर गरजेच्या वेळेस हात धरून मनोबळ वाढविणाऱ्या व्यक्तीची साथ खरी साथ असते हे केवळ अनुभवच शिकवू शकतो. अशी साथ नसल्यास प्रत्येक व्यक्ती ही एकटीच!

एकटेपण दूर करण्यासाठी असो किंवा मानसिक ताण कमी करण्यासाठी, आपल्याकडे बरीच साधनं उपलब्ध आहेत. गेले ते दिवस जेव्हा मानसिक त्राण कमी करण्यासाठी घरी आल्यावर दमलेले बाबा आपल्या बायको मुलांच्या सोबतीमध्येच आपला आनंद मानायचे. ते काही अमूल्य क्षण जे एक परिवार एकत्र राहून अनुभवतो ते काही कारणास्तव कमी होत चालले आहेत. आपण जन्माला आलो आहोत ते क्षणिक आनंद, सोबत श्रम, कष्ट आणि भोग भोगण्यासाठी आणि नाही म्हटलं तरी आपली जीवनशैली इतकी श्रमिक आणि त्रासदायक होत चालली आहे की घरी आल्यावर आपण इतर मनोरंजनाकडे नकळत वळत जातो. प्रत्येकाचा मानसिक ताण कमी करण्यासाठी साधनं निरनिराळी असतात. काही आपला ताण कमी करतात कादंबऱ्या वाचून, काही व्यायाम करून आपला थकवा घालवतात. परंतु हल्लीच्या जगात सर्वात जास्त मनोरंजक आणि मानसिक ताणापासून दूर लोटण्यास यशस्वी आहे तो टी.व्ही. आणि त्यावरच्या मालिका.

एखादी व्यक्ती जरी एकटीच घरात रहात असली तरी त्या व्यक्तीला सोबत असते ती टी.व्ही.वरच्या मालिकांची आणि नकळत त्या मालिकांमधील पात्रं आपल्या आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग होऊन

(पान २ कॉलम २ वर)

(पान१ कॉलम २ वरून)

तपशील घेऊन आपल्याभोवती वावरतच असतो. असा हा 'तो' हायकू. जीवाभावाचा. कधी कधी तर सहजतेने जगण्याचे, सुसंस्कृतपणाचे तत्त्वज्ञानाच रुजवणारा. 'येणार कधी

विचारू नये कुणा

पेरावा दाणा' असे सांगणारा- गणेश भाकरे यांचा हा हायकू. (नागपूर परिसरातले हे भाकरे माझे स्नेही आहेत. चंद्रपूरच्या साहित्य संमेलनातील वारीत गोविंदाग्रजांच्या सावनेर गावी आम्ही काही जणी जाणार आहोत, तेथील मातीला वंदन करणार आहोत ते या भाकरेंमुळेच. म्हणूनच त्यांना मी म्हटलं, ''अरे वा! आम्हाला म्हणूनच 'येणार कधी' असं विचारलं नाहीत वाटतं? अन् सगळी व्यवस्था करून दाणा मात्र पेरून ठेवलात!'' तर ते फोनवरच छान हसले. त्या पेरलेल्या दाण्यातून दोन पानं हलकेच वर आल्यासारखे! आश्वासक अन् सकारात्मक टवटवीत असे.) आता यात निसर्ग प्रतिमेतून जगण्याचे किती छाऽऽन तत्त्वज्ञान सांगितले आहे नं? अर्थात् 'तत्त्वज्ञान सांगितले आहे' असं म्हणणं बोजडच. पण समजूतदार हायकू असं करतात, वागतात हे मात्र खरं. 'पांथस्थानं थोडं

अनवाणी चालावं

वाटेचं दु:ख जाणावं' हेदेखील सुसंस्कृत लेणंच. वाटेला व्यक्तिमत्त्व बहाल करून एकमेकांचं दु:ख सहानुभाव दाखवून जाणून घ्यावं, वाटून घ्यावं; हे तत्त्वज्ञानच यातून 'वाटेवरची धूळ' होते.

ही धूळ मनाला माखून आपण जर हायकू वाचले तर भावार्थाची सुंदर उटी माखण्याचा आनंद आपल्याला मिळतो. केव्हा? आपण तरल मनाने असे हायकू वाचले तरंच!

म्हणजे वाचण्याची पण एक सुसंस्कृत पद्धती विकसित होणे आवश्यकच आहे. हल्ली वाचावे कसे?...यावरही खास कार्यशाळा घेतल्या जातात. आपली नेहमी म्हटली जाणारी आरतीच पहा. कोणती? गणपतीची हो! 'सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची नुरवी, पुरवी प्रेम कृपा जयाची' या ओळी म्हणताना काय करतो आपण? 'वार्ता विघ्नाची' म्हटलं की एक श्वासाचा थांबा घेतो. ('पॉझ', 'पॉझ'!) मग पुढे 'नुरवी पुरवी प्रेम' एकदम एका तालात. 'विघ्नाची वार्ता नुरवी' हा अर्थ येतो का म्हणण्यात?- वाचण्यात? तीच गोष्ट शेवटच्या 'घालीन लोटांगण, वंदीन चरण'ची. (पुढच्या प्रसादाची घाई म्हणून की काय;) ते इतक्या भरभर म्हटले जाते की 'घालीन लोटांगण, वंदीन चरण,

डोळ्याने पाहीन रूप तुझे,

प्रेमे आलिंगन, आनंदे पूजीन

भावे ओवाळीन, म्हणे नामा'चे शेवटी 'म्हणेनम:।' होऊन जाते. वाचन नीट तर पठण नीट. नीट झाले की मग अर्थही नीट. काव्यही सुंदर. असे वाचले की मग 'हायकू' अर्थपूर्ण होतो. उगाच 'हायकू कायकू?' असे नको मग म्हणायला!

'सगळी फुलं

सुईत घुसली

गजरा झाली!' अशी अवस्था होते. मग सुगंध दरवळत राहील. चौदा फेब्रुवारीच्या मैत्रीदिनासारखा! मित्रहो, मैत्रीदिनाच्या शुभेच्छा!

---

(पान१ कॉलम ४ वरून)

जातात असं आढळून येतं. ही पात्रं जणू काही लोकांच्या जीवनांशी एकरूप होतात आणि त्यांच्या जीवनाचा भाग होतात हे पाहून मला आश्चर्य वाटतं. मी स्वत: या मालिकापासून जरी दूर पळत असली तरी ज्या व्यक्तींनी या मालिकांना आपल्या जीवनाचा भाग बनवला आहे त्यांचं कौतुक वाटतं. माझं वैयक्तिक मत दूरदर्शनच्या विरुद्ध असलं तरी एका बाबतीत कौतुक नक्कीच आहे की काही व्यक्तीनी आपल्या कलाकौशल्याने बऱ्याच व्यक्तींचं एकलेपण दूर केले तर काही जणांचा मानसिक ताण कमी करून त्यांना मनोरंजनाचे एक सुंदर माध्यम दिले आहे.

अशा मालिका आणि त्यांची पात्रं जी आपल्या घरी रोज एका विशिष्ट वेळेला येतात त्याचे स्वागत करण्यासाठी काही लोक आपली कामे पटापट आटपून बसतात किंवा त्या वेळची भागीदारी अजून कोणाबरोबरही शेअर करणे पसंत करीत नाहीत. जवळ जवळ १२-१३ वर्षापूर्वी 'क्यूकी सास भी कभी बहू थी' नावाची मालिका प्रचंड लोकप्रिय झालेली. मला अजूनही आठवतं की, त्यावेळेस मी ही मालिका प्रकर्षाने पाहायची आणि एकही भाग पहायला चुकला की दुसऱ्या दिवशी न चुकता पुन: प्रक्षेपण पहायची. 'मीहीर विरानी' नावाच्या पात्राचा मृत्यू झालेला पाहून मला प्रचंड मानसिक त्रास झाला. तेव्हापासून एकही मालिका पहाण्यात रस उरला नाही. प्रत्येक वाहिनीवर तोचतोचपणा पाहून एवढा वीट आला की टी.व्ही.पासून दूर राहिल्यावर मनशांती लाभली.

एके दिवशी आमच्या अगदी जवळच्या नातेवाईकांच्या घरी गेले असताना एक आश्चर्यजनक गोष्ट आढळली. घरातले वडील सतत घड्याळाकडे पाहत होते हे लक्षात आले. आम्ही समोर बसलेले असताना त्याची नजर कायम घड्याळाकडे वळताना पाहून वाटले की आपण बराच वेळ बसलेले आहोत असे दिसते आणि हा संकेत आपण निरोप घ्यावा म्हणून तर नाही? परंतु तेवढ्यात विषय दुसरीकडे वळला आणि गोष्टी चालू झाल्या. काही वेळातच घरातली सूनदेखील घड्याळाकडे पाहू लागली. हे पाहून खात्री पटली की आता आम्ही निघावं अशी त्यांची इच्छा आहे. आम्ही त्यांचा निरोप घेताच सासरे आणि सून दोघेही टी.व्ही.चा रिमोट घेण्याकरीता धावले. जणू काही चूकेल तर अनर्थ व्हायचा. आम्हाला काही कळेना, पण शेवटी एकदाचं कोडं उलगडलं. 'बडे अच्छे लगते है' असं म्हणून सगळ्याचे चेहरे पाहून प्रफुल्लित झालेले पाहिले. आश्चर्याची बाब म्हणजे इतके वर्षात मी या इसमाना कधीही कोणतीही मालिका पाहताना पाहिले नव्हते. आणि तेच ही मालिका पाहायला एवढे उत्सुक आहेत पाहून मला आश्चर्य वाटले. दुसरा आश्चर्याचा धक्का म्हणजे त्यांचा दोन वर्षाचा नातू मालिका सुरू होताच 'राम कपूर ....राम कपूर'च्या नावाचा जणू जप करीत होता. मला अगदी कुतहूल वाटलं की एवढ्या लहान मुलाला काय कळत असावं की तोसुद्धा एवढा आनंदी झाला आहे. काय आहे काय या मालिकेमध्ये वेगळं ज्यानी घरातल्या सर्व मंडळीना एकत्र बांधून ठेवलं आहे, असे प्रश्न मी मनातच करत राहिले. त्या पूर्ण कुटुंबाचे शंभर टक्के लक्ष त्या मालिकेमध्ये पाहून आम्ही त्यांचा शेवटी निरोप घेतलाच.

एका मालिकेबद्दल एवढे गुणगान आणि तेसुद्धा निरनिराळ्या वयोगटातून मी प्रथमच ऐकत होते. त्यामुळे या मालिकेच्या दिग्दर्शकाला 'अप्सरा अवार्ड' मिळाला त्यात नवल वाटले नाही, परंतु प्रचंड अभिमान आणि आनंद झाला. कारण या यशाची खरी भागीदार आहे ती या मालिकेची दिग्दर्शिका- 'सौ. संगीता आशिष राव'. अर्थात आडनावावरून कळून येत नाही की ही व्यक्ती आपल्या परिचयाची आहे की नाही. म्हणूनच तुमच्या पुढ्यात प्रथमच सादर करीत आहे, एक यशस्वी आणि प्रभावशाली व्यक्तीमत्व; जी आपली आहे, आपल्या पाठारे प्रभु परिवाराची सदस्य आहे.

संगीता आशिष राव पूर्वाश्रमीची संगीता विश्वनाथ बाने. एक तेजस्वी, कलासंपूर्ण आणि कर्तृत्ववान व्यक्तीमत्व. संगीताचे प्रभावशाली व्यक्तीमत्व आपल्या आशिष सतीश रावला भावलं जेव्हा ते शिवाजी पार्क येथे काही मित्र-मैत्रिणींबरोबर प्रथम एकमेकांना भेटले आणि संगीताची प्रभावशैली पाहून या सतत सुमुखी चेहऱ्याला आशिषनी आपल्या पाठारे प्रभु कुटुंबात सामावून घेतले. अतिशय सोज्वळ आणि मनमिळावू व्यक्तीमत्वाची संगीता अशी काही रुळली राव परिवारात की तिने सासरच्या सर्व लोकांची मने जिंकली. कामात अतिशय व्यस्त असतानासुद्धा ती तिच्या कामातून वेळात वेळ काढून कौटुंबिक सोहळ्यांनासुद्धा हजर राहण्याचा प्रयत्न करीत असते. या कलागुणाव्यतिरिक्त रांगोळी आणि हस्तकलेतसुद्धा तिचे नैपुण्य आहे. माहेरच्यांच्या मायेची तोड सासरची माणसे कशी बरं करू शकणार? तरी संगीताच्या कलेचं आणि तिच्या कर्तृत्वाचं आम्हाला कौतुक आहे आणि मुख्यत: तिचा अभिमानसुद्धा आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे जशी एक स्त्री असते त्याचप्रमाणे प्रत्येक यशस्वी स्त्रीच्या मागे पुरुष असतोच. संगीता नशीबवान आहे की तिला प्रोत्साहन देणारे आणि सतत ठामपणे मागे उभे राहणारे एक नाही; तर दोन पुरुष आहेत. ज्यांनी तिच्या प्रत्येक कलागुणांना योग्य प्रोत्साहन दिले. हे दोन पुरुष म्हणजे संगीताचा नवरा आशिष राव जो स्वत: एक यशस्वी दिग्दर्शक आहे आणि दुसरे म्हणजे संगीताचे सासरे सतीश राव. संगीताच्या अनियमित वेळेमुळे जो वेळ तिला घरात देण्याकरीता अवघड जात होता तिथे तिच्या सासऱ्याने भर घालून घर सुरळीतपणे सांभाळले. संगीताच्या कारकिर्दीला पूर्णत: पाठिंबा देणारे तिचे सासरे यानी संगीताला आपल्या मुलीप्रमाणे प्रेम आणि प्रोत्साहन दिले. सतीश राव यांना स्वयंपाक बनवण्याची खास रूची आणि कौशल्य असून त्यांच्या हातचं जेवण म्हणजे एक मेजवानी म्हणायला पाहिजे.

संगीताने तिची दिग्दर्शकीय कारकीर्द 'आभाळमाया' या मालिकेपासून सुरू केली जी 'झी' मराठीवर प्रक्षेपित झाली. त्यानंतर तिने इतर बऱ्याच सुप्रसिद्ध मालिका दिग्दर्शित केल्या. त्यात काही लोकप्रिय झालेल्या आहेत. 'किमयागार' आणि 'एक होता राजा' ज्या तिने ई टीव्ही मराठीसाठी केल्या. 'शगून', 'करम अपना अपना', 'तुम संग प्रित लगाई' आणि 'कसोटी जिंदगी की' स्टार प्लससाठी, 'कुसूम' सोनीसाठी, 'क्या होगा निमोका' स्टार वनसाठी, 'सीझन १ सीझन २' आणि 'कितनी मोहब्बत है' एनडीटीव्ही इमाजीनसाठी. एवढ्या यशस्वी मालिका केल्यानंतर २०११ मध्ये संगीताला 'बडे अच्छे लगते है' या मालिकेसाठी उत्तम दिग्दर्शक म्हणून प्रथम आयटीएए (इंडियन टेलिव्हिजन ॲकडमी अवार्ड)ने नामकरण केले होते; परंतु संगीताने बाजी जिंकली ती २०१२च्या 'अप्सरा अवार्ड'मध्ये, ज्यात तिला उत्तम दिग्दर्शकाचे 'बडे अच्छे लगते है' मालिकेसाठी पारितोषिक मिळाले.

संगीताच्या यशाचे कौतुक आहेच आणि तिने अजून मोठी भरारी घ्यावी अशी आशा आणि अपेक्षा आहे. संगीताने आपल्या ज्ञातीला हा मान देऊन पाठारे प्रभुच्या कीर्तीत अजून एक तुरा खोवला आहे. संगीता आशिष राव- उत्तम दिग्दर्शक म्हणून तुझं नाव देशभर नव्हे; परदेशातही पोहोचावं अशी मनोकामना करते. आणि प्रभुतरुण कुटुंबीयांतर्फे तुला अनेक आशीर्वाद आणि तुझ्या पुढील वाटचालीत प्रचंड यश लाभो अशी मनोकामना व्यक्त करते.

*

लेखांक-२

# कालची मुंबई-आजची मुंबई

— विश्वास नारायण अजिंक्य

ईस्ट इंडिया कंपनीने आपले प्रमुख ठाणे मुंबईस हलविल्यावर समुद्राचे आक्रमण थांबवून त्याखाली जाणारी जमीन मोकळी करण्याची खटपट चालविली. पण अडचणीच फार. पहिली अडचण अर्थातच पैशाची. कंपनी व्यापार आणि नफ्यासाठी जन्माला आलेली. तिच्या तिजोरीच्या चाव्या लंडनमधील संचालकांच्या ताब्यात. त्यांच्या परवानगीशिवाय नेहमीच्या खर्चाबाहेर खर्च करणे मुश्कील. परवानगी मिळाल्यावर कामे मार्गी लावू म्हटले तर मजुरांची वानवा. कित्येकदा शेजारचा शत्रू एखादे काम उभे करून त्यात आजुबाजूच्या गावातील मजूर गुंतवून ठेवीत.

समुद्राचे पाणी हटवून, भराव घालून जमीन लागवडीस, लोकांच्या वस्तीसाठी तसेच वाहतुकीस योग्य केल्यानंतर ती जमीन मुंबई सरकार एकतर शेतकऱ्यांना खंडाने देत असे किंवा व्यापाऱ्यांना दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देत असे. समुद्रातून काढलेल्या भूमीत धान्य पिकवून मुंबई स्वयंपूर्ण करण्यासाठी त्यांनी माळी, भंडारी लोकांना उत्तेजन देऊन धान्याचे, फळे व भाजीपाल्याचे पीक वाढविले. कारण तोपर्यंत अन्न-धान्यासाठी पोर्तुगीज, सिद्दी, मराठी यांच्या तोंडाकडे पहाण्याशिवाय इंग्रजांना गत्यंतर नव्हते. आपसातल्या संबंधात बिघाड झाला की अन्नधान्याचा प्रश्न इंग्रजांपुढे उभा राहायचा. एक-दोन वर्षे तर पोर्तुगीज लोकांनी आणि संभाजी महाराजांनी आपआपल्या राज्यांतून धान्य व भाजीपाला मुंबईस जाणे बंद केल्यामुळे लोकांचे फार हाल झाले.

१६८९ मध्ये तर मुंबई इंग्रजांच्या हातून जावी अशी वेळ येऊन ठेपली होती. जंजिऱ्याचा सिद्दी हा मुघल आरमाराचा मोठा अधिकारी. मुंबईच्या बंदरात तो बेधडक घुसायचा. शिवाजी महाराजांशी त्याचे वाकडे असल्यामुळे त्यांच्यावर चाल करून जाण्याच्या मिषाने इथे तळ देऊन बसे. बाजार लुटणे, खून करणे हा सिद्दी सैनिकांचा खेळ. हा उपद्रव १६७२ पासून चालूच होता. १६८९ मध्ये चाईल्ड नावाचा कंपनीचा गव्हर्नर होता. त्याने सिद्दीच्या जहाजावरील माल उतरवून घेतला होता. सिद्दीने तो परत देण्याविषयी मुदत देऊन कळविले. पण चाईल्डने त्याची दाद न घेतल्याने सिद्दीने १६८९च्या फेब्रुवारी महिन्यात मुंबईवर खऱ्या अर्थाने स्वारी केली. पण सिद्दीशी लढण्याची ताकद आपल्यात नाही हे चाईल्डच्या लक्षात आले व त्याने त्यावेळी महाराष्ट्रात मोहिमेवर आलेल्या औरंगजेब बादशहाकडे शिष्टाईसाठी दोन इंग्रज वकील पाठविले. त्यावेळी चाईल्डला आपल्या गैरवर्तनाबद्दल हात बांधून बादशहासमोर अक्षरश: लोटांगण घालून माफी मिळवावी लागली. नुकसानभरपाई, दंड, सिद्दीच्या स्वारीचा सर्व खर्च; तसेच चाईल्डने नऊ महिन्यांत इंग्लडला परत जावे अशा अटी फर्मानात घालून बादशहाने त्याला माफी दिली व सिद्दीला मुंबईतून तळ उठविण्याचा हुकूम पाठविला. वर्षभर राहून शेवटी माजगावचा किल्ला जाळून टाकून १६९०च्या जून महिन्यात सिद्दी परत गेला. या प्रसंगानंतर लवकरच चाइल्ड वारल्यामुळे हाकलपट्टीच्या सोहळ्यातून तो वाचला. तसेच इंग्रजांच्या मागचा सिद्दीचा उपद्रवही संपला. पण सिद्दीच्या स्वारीने केलेली लुटालूट, जाळपोळ, पोर्तुगीजांच्या कटकटी, साथीचे रोग यामुळे मुंबईच्या रहिवाश्यांना प्राण व धन याबद्दलचा आत्मविश्वास वाटेनासा झाला. ते मुंबई सोडून अन्यत्र जाऊ लागले. त्यामुळे १६९०-९१ सालानंतर मुंबईची लोकसंख्या सत्तर हजारांवरून सोळा हजारांवर घसरली होती. रोगाची साथ हे प्रमुख कारण होते. साधारणपणे १७१० नंतर रोग, परकीय आक्रमणांचे भय बरेचसे ओसरले. धार्मिक स्वातंत्र्यामुळे ठाणे, वसई ह्या भागातील खूप लोक मुंबईत आले व मुंबईची वस्ती झपाट्याने वाढली.

तेराव्या-चौदाव्या शतकापर्यंत मुंबई व लगतच्या परिसरात फक्त हिंदूंची वस्ती होती. पंधराव्या शतकात गुजराती सुलतानांच्या सत्तेमुळे येथे मुसलमान अवतरले. तर पोर्तुगीजांच्या बाटवाबाटवीमुळे ख्रिश्चन आले. धर्म वाचवायला जसे इराणमधून पारसी हिंदुस्तानात आले तसेच आशिया खंडाच्या सरहद्दीवरील सीरीया वगैरे देशातून यहुदीही आले. नंतर ते मुंबईत आले. मुसलमानांतही सुन्नी-शिया व्यतिरिक्त शेख, सैय्यद, बोहरा, खोजा, मेनन, कोकणी मुसलमान, इराणी हे भेद आहेतच. तर ख्रिश्चन लोकांत कॅथलिक व प्रॉटेस्टंट.

मुंबईची बेटे कब्जात आल्यावर इंग्रजांनी धार्मिक छळाचे धोरण बाळगले नाही. त्यामुळे येथे सर्व धर्मांच्या लोकांची वस्ती वाढली. पण धर्म-भाषा यांच्या भेदानुसार वस्तीही झाली. हिंदू-मराठी भाषिकांची वस्ती गिरगावात जास्त; तर गुजराती भाषिकांची भुलेश्वर, काळबादेवी भागात. त्या पलीकडे भेंडीबाजार, शेख मेमन, अब्दुल रेहमान, मदनपुरा भागात प्रामुख्याने मुसलमान राहतात. धोबीतलाव, वांद्रे, माहिम येथे ख्रिश्चन; तर कुलाबा, खेतवाडी, ग्रँटरोड, लालबाग, दादर येथे पारसी समाज प्रामुख्याने रहातो.

मुंबईतील वाड्यांची अथवा विशिष्ट जागांची नावे ही तेथील वनस्पती किंवा जागांचे मालक यांच्या नावावरून पडलेली आढळतात. आज काही नावे बदलली तरी मूळ नावे अजूनही तशीच आहेत. अनेकदा ज्या कारणासाठी ते नाव पडले ते कारण मात्र आज अस्तित्वात नाही. खेत म्हणजे शेत. खेतवाडीला हे नाव तेथे असलेल्या शेतीवाडीवरून पडले. तर फणसवाडी व पोफळवाडी ही नावे फणसाच्या व पोफळीच्या बागांवरून पडलेली आहेत. गायवाडी ही गाईसाठी असलेली मोकळी जागा; तर कांद्याच्या वखारीमुळे कांदेवाडी; तर मांगलवाडी, सदाशिव लेन, फाटकवाडी ही नावे तेथील मालकांच्या नावांमुळे पडली. तर भाटिया बाग, खोताची वाडी ही नावे तेथे रहाणाऱ्या विशिष्ट लोकांमुळे पडली. तसेच मातीचा रस्ता व खोलगट भाग ह्यामुळे पावसाळ्यात चिखल होत असे म्हणून चिखलवाडी. या व्यतिरिक्त चिकूवाडी, अंजीरवाडी आणि कुंभारांचा व्यवसाय असणारे कुंभारवाडे आहेतच.

मुंबईच्या गव्हर्नरचे निवासस्थान तर परळला आजच्या हाफकीन इन्स्टिट्यूटजवळ होते. मलबार हिलवर जाण्यासाठी रस्ते व अन्य सुविधा झाल्यावर गव्हर्नर परळ सोडून मलबार हिल येथे रहावयास गेले. मुंबईतील ठाकूरद्वार भागातील झावबा, किर्तीकर, शंकर शेटांचे वाडे सोडले तर वाडा संस्कृती फारशी रुजलेली नव्हती. शंकरशेटांचा वाडा ही मुंबईची शान समजली जात असे. काळाच्या ओघात हे सारे लयाला जाऊन त्या ठिकाणी आधुनिक पद्धतीच्या गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या. पण परळमधील जयकरांचा वाडा मात्र शंभर वर्षे उलटून गेली तरी अजूनही शाबूत आहे. मुंबईत मारवाडी, भाटिया, गुजराती, पारसी धनिकांचे बंगले होते. नेपियन सी रोड, अल्टामाऊंट रोड, कार मायकेल रोड व मलबारहिलवरील बरेचसे बंगले १९५०च्या सुमारास पाडले गेले. आता ते वैभव फक्त मंत्र्यांच्या बंगल्याच्या रूपाने शाबूत आहे. १९३७च्या निवडणुकीनंतर काँग्रेस पक्षाने मंत्रिमंडळ बनवले तेव्हा मलबार हिलवरील वर्षा, सह्याद्री, मेघदूत, पर्णकुटी, सातपुडा, शिवनेरी इत्यादी बंगले मंत्र्यांच्या निवासासाठी खरेदी केले. तर सध्याचे महापौरांचे निवासस्थान म्हणजे मूळचा बिकानेरच्या महाराजांचा बीच हाऊस बंगला होता. तो १९२८ साली विकत घेऊन त्याची डागडुजी केली गेली. तर ससून कुटुंबियांच्या प्रशस्त बंगल्याचे रूपांतर मसिना इस्पितळात करण्यात आले. जुन्या तसेच नव्या जमान्यातील चित्रपट अभिनेत्यांचे; तसेच काही उद्योजकांचे बंगले अद्याप जुहू, विलेपार्ले येथे उभे आहेत. वांद्रा पश्चिम येथे चॅपेल, चिंबई, पाली इत्यादी गावठाणे तेथील बैठी घरे व शांत रस्ते यामुळे वैशिष्ट्यपूर्ण वाटत होती. आता अन्य ठिकाणांप्रमाणे तेथील घरे व कॉटेजेस् नष्ट होऊ लागली आहेत.

मुंबईत १८५४ साली कापडाची गिरणी निघाली. तत्पूर्वी आगगाडीचा कारखाना सुरू झाला होता. कारखान्यात राबणारा कामगार खेड्यातून मुंबईत आला. त्याच्यासाठी चाळी आणि खानावळी उदयास आल्या. गिरणी कामगारांपेक्षा विविध सरकारी वा खाजगी कार्यालयात काम करणाऱ्यांची आर्थिक स्थिती जरा बरी असल्यामुळे त्यांच्यासाठी गिरगाव, दादर भागात अनेक चाळी बांधल्या गेल्या. मुंबईत पूर्वी बैठी कौलारू घरे

(पान ६ कॉलम ४ वर)

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# YUVA MANCH

Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

## KG at 27

**-Sumeet Suvarnakumar Navalkar**

It was her dream for years. For her, it had an appeal. She wanted to learn to play the guitar. And years after first dreaming about it, she had taken admission for the course. Some apprehension obviously surfacing in her mind, she had started attending the classes. The first few lectures were theory and then for the first time, in her life on the eighth day of her class, she held the guitar in her hands.

It was not as heavy as she had expected it to be. Only six strings of different lengths ran along it, held at one end by the keys, which could be tightened or loosened changing the tautness in the strings. She had dreamt about the guitar, but she had never wondered about that piece of plastic or metal that puts real life in that instrument, or even what it was called. She learned that it was the plectrum that is used to pluck the strings to produce the music or noise depending on who handles it and how.

In the first few days, it was only taught how to hold the guitar properly and a few basic notes that she could play at ease. But as the days passed and the notes started getting more complex, the anxiety that she had from the day she had joined the class, started blocking her mind. It started becoming tougher for her. The guitar used to slip from her grip, her hands getting sweaty. Worse, she used to lose her plectrum on the floor and then make a scene trying to get it from below the feet of her fellow guitarists. Then holding it wrongly and fumbling with it, she used to play all the notes properly, except that they were never in a proper order. A week later, she had lost most of her confidence.

On that day, she began with the same clumsiness on the guitar and fumbling with the plectrum, produced noises that resembled the cacophony of the morning traffic. Just then as if fate being a bit sympathetic towards the ears of others, as usual she lost her plectrum. As she bent down to retrieve it, an old memory passed her mind. A memory that had a layer of dust accumulated on it over the years, but which had suddenly surfaced as if her mind trying to teach her an old lesson. She was in kindergarten at that time. And her teacher was daunting her to get the order of the English alphabet properly. ‘m’ always came before ‘n’, the ghost of her teacher from her mind told her. As a child, she had never understood why ‘m’ preceded ‘n’. The tougher to write letters or the ones involving a single curve should come before those involving a double curve, but nevertheless she had to accept what her teacher had told her. And now, she had become competent to read, write, understand and speak the language. At that time, her mind was like clay that had been moulded and shaped up into what it was now.

Even today, some of her mind was still the wet clay waiting to be worked upon by a skilled craftsman. Even today, she was in the kindergarten of this music class. She learned the English alphabet and that too in a proper order at the age of three. Then why can’t she learn the guitar at the age of twenty-seven. What was it that had blinded her mind? May be the not-so-thoughtful remark by the receptionist, "No one starts learning music at this age. It becomes difficult. People at your age already are an expert". She was undeterred by this remark at that time. But, it had hung on to her mind making it to cough out in irritation every time she failed. It had an effect that she had never anticipated.

Just then she found her plectrum. She looked at it and before getting up and resuming her experiment with the guitar, she plucked out this particular negative string from her mind. Then she looked at the instrument in a new light. The logic from her childhood, she had stuck to it even at this age. She had always wondered that if the octet contained eight notes, then there should have been at least eight strings on the guitar, why six? She imagined her KG teacher telling her, ‘this instrument has only six strings and you will have to compose music from these six, not eight’. She passed her fingers on the strings, got up and went home.

The next day, it had all changed. She had started getting it all right. ‘m’ had started coming before ‘n’. She had learnt the ‘Twinkle Twinkle Little Star’ of guitar that still had only six strings. Practice, practice and practice and a month later, she could play a whole song, although she still had to refer to the notes. But she was better than most of those who had started with her. She had always dreamt of playing that tune and when she had finished playing, the whole class had applauded, her teacher proud of the dexterity with which her hands and fingers ran on the body of the guitar, caressing it and making it sound beauty.

That day, long after she had finished playing the music, long after the echo of that sound had died down, the symphony still reverberated in her ears, satisfied with herself, but not complacent. Her confidence had been back. The waves of that sound that she had herself created had touched the shore of her heart. The sea of music inviting her to take a dive and explore its untouched and enigmatic depths and cross the limits of its unknown boundaries. She saw herself swimming in this ocean of symphony and notes, imagining the soothing beauty engulfing her. This was the beginning of the voyage that had the power to form an island of new tunes, which perhaps different minds would like to visit and enjoy in the freshness of its atmosphere.

Her heart now was the plectrum that created the music of happiness on the guitar of her mind.

## Fortune Teller

**-Ajit Mankar**

(cont. from last issue)

Naik kept on talking about my future that afternoon, and I kept silent. I did not dare to interrupt him by evincing interest whatsoever because I was totally frightened by his gruesome appearance. He told me many intricate things of the future that subsequently unfolded in reality. I do not wish to bore my readers on this count. Just to cite a glimpse, he warned me never to buy a vehicle of fiery bright colour. Ignoring his advise I chose fiery red colour for my first Maruti 800 in 1984.The car got totally smashed in an accident at the hands of a mechanic of Maruti Udyog barely within a year of purchase, killing 2 young motor-cyclist and the driver on the spot with the car crumpled and reduced to just one piece of sheet metal. Naik went on and on talking in details about my future life and came to a sudden jerky halt after predicting our family millennium party of 31st December, 1999, and the subsequent departure of my daughter Reshma and her husband that same night to Sri Lanka on an official posting for 5 years. At this point, Naik totally lost control and got exhausted. I offered him a glass of water, but he did not drink it. It took him about 2 minutes to return to his senses, became normal, got up and went back to his seat. He then slept resting his head on the table for nearly an hour. Not that I was appreciating his fortune telling, but his sudden stoppage and hurried withdrawal at this point made me a little nervous and restless. I tried hard to remove the whole episode from my mind, but with no success. I was curious to know what made Naik stop at that particular juncture! Or was it the end of my time on earth that Naik implied? Of course, it was not my nature to seek clarification from him, as I always disliked this man. The time passed by. Even the night of 31st December 1999 went off peacefully. By then the whole incident was forgotten and became history. My office colleague Suresh Sawant invited me to attend the wedding of his son on the following 26th January 2000.While posing for a group photo, Sawant whispered in my ears that Naik expired on 1st January,2000.I was shocked to hear this. I came down from the dais, sat for a while and got over the shocking news. Later I asked Suresh as to what happened to Naik? Suresh said that on the 31st night Naik had gone to the sea-shore and got drowned in the darkness. According to the police records Naik committed suicide. I took Suresh to one side and expressed my doubt that Naik did not commit suicide but instead got murdered. On hearing my comments, Suresh got lost and non-plus for a moment. Slowly he recovered and asked what makes me say this. I then narrated in short, what I experienced in the office and on what note the unpalatable encounter ended with Naik that afternoon. I clarified to Suresh that Naik was a Tantric specializing in witch-craft and was controlling some dead soul as a

(Cont. on page 6 col. 3)

लेखांक २

# चिमणीच्या दातांनी हरवलेले शब्द

-कल्पना सुभाष कोठारे

कालौघात लिखित व बोलीभाषा बदलत जातात. वयोमर्यादा वाढल्याने हल्ली काही 'लकी' घरात, आजीआजोबा, क्वचित् पणजी पणजोबाही असतात. या म्हाताऱ्या मंडळींना 'ज्येष्ठ नागरिक' म्हणून संबोधले जाते. ही ज्येष्ठ मंडळी, कधीकधी भाषाबदल विसरून, जुनेच शब्द, म्हणी वापरतात. त्यांच्या नातवंडा-पतवंडाच्या चेहऱ्यावर भलेमोठे प्रश्नचिन्ह उभे राहते. अर्थ न कळल्याने मस्त, धमाल विनोदी प्रसंग उद्‌भवतात. असेच काही प्रसंग आपण चक्क दुसऱ्यांच्या घरात डोकावून, 'एन्जॉय' करणार आहोत. चला, येता नं?

''ममा ऽ फिदीफिदीचं मीनिंग काय?'' मिनी ममाची ओढणी ओढत विचारतेय 'अं? काय म्हणालीस?' 'अगं आताच आजी म्हणाली, फिदीफिदी काय करतेस...' 'अगं पण झालं तरी काय?' 'ज्योक झाला म्हणून मी हसले! 'कसला ज्योक?' 'अगं आजोबा आजीला म्हणाले, उगीच नाही माझे केस पांढरे झाले- अनुभव आहे माझा!' 'बंटी मधेच म्हणाला- पण आजोबा, तुमचे केस पांढरे कुठे आहेत? कालच तर तुम्ही हेअरडाय् लावलायं-मग मला हसायलाच आलं; तर आजी ओरडलीच अन् म्हणाली फिदीफिदी काय करतेस..., शेवटी मिनीला तिच्या प्रश्नाचे उत्तर मिळतच नाही. कारण आता तिची ममाच फिदीफिदी हसू लागलीय.

एकदा सोसायटीच्या पॅसेजमध्ये छोटू, एका पायाने स्कूटर चालवीत, टॅक्सी-टॅक्सी-खेळत होता. जवळच पाय ऱ्यांवर बसून त्याचे व मिनीचे आजोबा, गप्पा करीत होते. यंदाचा मे महिना तीव्र पाणीटंचाई घेऊन आला होता. सोसायटीच्या सेक्रेटरीने पाण्याचा टँकर मागवून घ्यावा, असे काहीसे दोन आजोबा बोलत होते. छोटूची टॅक्सी, मिनीला पॅसेंजर म्हणून घेण्यास 'स्लो' झाली, तेव्हा त्याच्या कानावर आजोबांचे रागीट स्वर पडले. ते तावातावाने म्हणत होते, 'ऐकत नाहीत म्हणजे काय ही मुलं? म्हणावे, तुमच्यापेक्षा आम्ही जास्त पावसाळे पाहिलेत!' 'अहो आजोबा, त्या पावसाळ्यात 'रेन हार्वेस्टिंग' का केलं नाही तुम्ही? आता उपयोगी पडलं असतं नं साचवलेलं पाणी!' शाळेतील ज्ञानाच्या आधारे छोटूने केलेली ही घुसखोरी अर्थातच छोटूची टॅक्सीसहित हाकलपट्टी होण्यात परिणीत झाली-हे वेगळं सांगायला नकोच!

सोसायटीतील कुमारदादाचे व त्यांच्या आजोबांचे छान जमते. आजोबा कुमारला 'कॉम्‌गुरुच' म्हणतात. कुमारच्या डॅडींना मात्र त्या दोघांचे कॉम्प्यूटरवरचे ईमेल, फेसबुक, नेट सर्फिंग हे प्रकार रूचत नाहीत व कळतही नाहीत. कुमारदादा सारखा नोकऱ्या बदलत असतो म्हणून डॅडी त्याच्यावर नाराज असतात. 'बदलामुळे मॅनेजमेंट स्किल वाढते' हे कुमारदादाचे 'पेट्' वाक्य आहे. आजोबा डॅडींना समजावतात. 'हल्लीची ही पोरं हुशार आहेत रे! लाथ मारतील तिकडे पाणी काढतील!' राजूने हे ऐकले. संध्याकाळी क्रिकेट खेळतांना, राजूने व दोस्ताचे वाजले. दोस्त त्याची नवीन बॅट राजूला देत नव्हता. राजूने संतापाने स्टंप्सना पायाने उडविले. त्याबरोबर चिखलाचे पाणी दोस्ताच्या अंगावर उडले.'नकोच तुझी बॅट! आमचे आजोबा म्हणतातच नाहीतरी, आम्ही लाथ मारू तिथे पाणी काढू! बघ उडलं नं पाणी?' जवळून जाणाऱ्या आजोबांनी, राजूचे हे वक्तव्य ऐकले मात्र, त्यांना हसावे कीं रडावे, तेच कळेना!

कधीकधी मोठ्याकडून उत्तर मिळण्याआधीच, बच्चे लोक स्वतःच शब्दांचे अर्थ लावून मोकळी होतात. तीही मोठी मजेशीर असतात. या पहा दोन आज्या, गप्पा करीत आहेत. समोरच मधुआंटीच्या तळमजल्या-वरच्या घरावर, 'पाळणाघर' अशी पाटी आहे. तिथे सहा महिन्याच्या बाळापासून ते सहा वर्षाच्या मुलांपर्यंत सर्वजण धमाल करीत असतात. एखादा रडवेला चेहरा ग्रिलआड दिसतो. तो पाहून कामत आजी मैत्रिणीला म्हणतात, 'कसं बाई हल्लीच्या मुलीचं ऑफिसच्या कामात लक्ष लागतं, इथे मुलांना रडत ठेवून?' मैत्रीण समंजसपणे म्हणते, 'काय करतील बिच्चाऱ्या! वडिलधारं नसेल घरी कोणी संभाळायला! महागाई तर आभाळाला भिडलीय. नोकरी सोडता येत नाही.' 'माझा बाई जीव तुटतो मुलांना असं रडताना पाहयलं की!' 'थोड्याच दिवसात रुळतात हो मुलं! पाळणाघरातील मुलं जास्त सोशल अन् स्मार्ट होतात!' 'तरी पण, आईच्या प्रेमाची ऊब...' 'अहो, कामवाली कॉमन झालीच कीं नाही? आपल्यावेळी मोलकरीण ठेवली तरी सासवा टोमणे मारायच्या!' 'हे मात्र खरं हं सासूबाईच्या आजारात मी पोळीवाली बाई लावली होती तर अगदी कानकोडं वाटायचं.' 'हल्ली तर घरोघरी पोळीवाल्या बाया दिसतात. तसंच, हे क्रेश, फेश, हळुहळू पचनी पडेल आपल्याही!' 'आजी, कानकोंड म्हंजे? अन् पचनी पडेल म्हंजे...?' अचानक प्रगटलेल्या पिंटूच्या या प्रश्नाने दोन आज्यातील संवादं थांबलाच! आजीचे डोळे मोठे होणार इतक्यात पिंटूला पिंकीने बाजुला ओढून नेले. 'पिंटू, मोठ्यामधे बोललास म्हणून रागवेल नं तुझी आजी!' 'अगं पण मी फक्त 'कानकोडंचं मीनींग विचारलं' असेल रे काहीतरी कानात सांगायचं कोडबिडं!' 'हं! हं! म्हंजे मोठ्याचं पझल्? पण मग 'पचनी पडेल' म्हंजे?' 'अरे, टीचरनी शिकवलंय चार्टवरून आम्हाला!' खाली बसून वाळूवर चित्र रेखीत, पिंकीटीचर पिंटूला पचनव्यवस्था शिकवू लागली. 'हे बघ, स्प्रिंगसारखं मोठं आतडं असतं पोटात अन् हे छोटं आतडं.' 'स्प्रिंगसारखं म्हंजे?' 'अरे ती डासांची कॉईल नसते का गोलगोल? तसं! आपण जे खातो पितो ते असं गोलगोल फिरत येतं अन् शी-शू बनून बाहेर पडतं. याला पचन म्हणतात. 'पण मधुआंटीच्या क्रेशमधे पचन-असं का म्हणाली आजी?' 'तिथे ती छोटी गोलगोल घसरंडी आहे नं-ती पाहिली असेल तुझ्या आजीनी! जाऊ दे नं-आपण आपल्या घसरंडीवर जाऊ या?' कानकोंडं वाटणे, पचनी पडणे-या शब्दांचा काय मस्त अर्थ लावला नं पिंकी टीचरने?

सोसायटीचा राऊंड पूर्ण करून आपण परत मिनीच्या घरी शिरूया! मोठ्या मुलीसारखी, मिनी, ममाच्या भिशी पार्टीत मदत करतेय. भरलेली बशी एका आंटीच्या हाती देताना आंटी म्हणतेयं, 'मीने, तुझ्या आजी दिसत नाहीत त्या?' मिनीने उत्तर देण्याआधीच देशमुख आंटी म्हणाली, 'गेल्या असतील दाते आजीकडे! दोघींचे अगदी गूळपीठ आहे नं!' चिठ्ठ्यांच्या बाउलमधून मिनीने पांडे आंटीच्या नावाची चिठ्ठी काढली. पुढील महिन्यात ममा पांडे आंटीकडे पार्टीला जाणार, हे मिनीला कळले. पण 'गूळपीठ म्हंजे काय' हे तिला कळलेच नाही. सगळ्याजणी घरी गेल्यावर आजी परतली. मिनी तिला झोंबून म्हणाली, 'आजी, मलापण दे नं गूळपीठ!' 'काय म्हणतेय गं ही?' 'अहो काही नाही! ती देशमुखीण म्हणाली तुमचं अन् दाते आजीचं गूळपीठ आहे. तेच ऐकलं वाटतं हिनं!' ममा उत्तरली. 'मिनूबाई, गूळपीठ असणं म्हणजे घट्ट मैत्री असणे! दाण्याच्या पिठाला गूळ चिकटला की

(पान ६ कॉलम ३ वर)

# कोकणातील प्रागऐतिहासिक स्थळचित्रे

*महाराष्ट्रातील दक्षिण कोकणात नवाष्म आणि मध्याष्म युगातील प्रागैतिहासिक स्थळचित्रे आढळून आली आहेत. हा शोध झेविअर्स महाविद्यालयाच्या प्राचीन भारतीय संस्कृती विषयाच्या विभागप्रमुख सौ. अनिता सुनील कोठारे यांनी लावला. त्यांचे अभिनंदन. त्यांचा नवशक्तीत प्रसिद्ध झालेला लेखांश येथे देत आहोत.*

आज महाराष्ट्रात इतिहासाची समृद्ध परंपरा आहे. आमची टीम जेव्हा दक्षिण कोकणात भटकंतीला गेली होती तेव्हा महाराष्ट्रातील रत्नागिरी विभागातील महत्त्व असणारी तीन स्थळे शोधून काढली आणि विशेष म्हणजे ही तिन्ही स्थळे पश्चिम घाटातील सह्याद्रीच्या पर्वत रांगेतली आहेत. पहिली दोन स्थळे ही गोवा हायवेवरील कापड गावाजवळ असलेल्या चिन्दवलीतील टेकड्यावर सापडली. पहिल्या ठिकाणी सहा पेट्रोग्लिक्स आढळून आली. त्यात उभा माणूस, माकड आणि घुबड यांचा समावेश होतो. तिथून पुढे निवळी फाट्यानजीक प्राचीन काळातील मार्ग सूचित करणारा पतंगाच्या आकाराचा नकाशा सापडला. तर परग्रहावरील व्यक्तीस सूचित करणारे एक कोरीव चित्र देखील मिळाले आहे. त्यावरून ते नवाष्मयुगातील असावे असे दिसून येत आहे.

तर दुसरे म्हणजे निवसर स्टेशनजवळ सगळ्यात जास्त म्हणजे २३ कोरीव स्थळचित्रांचा खजिना पाहायला मिळाला. बाणांनी छेदलेला रानगवा, डॉल्फिन, रान डुक्कर, पक्षी असे एकाहून एक सरस पेट्रोग्लिक्स सापडले आहे. या वस्तुंवरून त्यांनी अनेक तर्क - वितर्क मांडण्यास मदत होणार आहे. इथे सापडलेल्या माशांच्या आकृत्यांवरून येथील जमातीला मासेमारीची माहिती समजते. तर कोकणातील व दख्खनमधल्या जांभ्या दगडातील फरक, शिकारीसाठी केलेल्या धातूचा वापर असे काही निष्कर्षही सापडले आहेत. इथल्या धार्मिक परंपरांचा संदर्भ देणे कठीण असले तरी कोकणातील ही परंपरा हिब्रू संस्कृतीपेक्षा जुनी आहे असे त्यांनी सिद्ध केले आहे. अशी प्रागैतिहासिक महत्त्व असणारी स्थळे इतिहास प्रेमींसाठी एक पर्वणीच आहे, हे नक्की.

## पाठारे प्रभु महिला समाज

२९ जानेवारी २०१२ रोजी खार येथील ज्ञाती सभागृहात महिला समाजाचा आनंदमेळावा भरला होता. दरवर्षीप्रमाणेच या मेळाव्याला उत्तम प्रतिसाद लाभला. दरवर्षीपेक्षा काही गोष्टी मात्र सुखद, लक्षणीय होत्या. यावर्षी तब्बल एकशेदहा गाळे होते. पहिला मजला आणि तळमजला दागदागिने, परभांच्या रांगोळ्याच्या तयार आकृती, खाणेपिणे, सुशोभित करणाऱ्या वस्तू, पर्सेस-पिशव्या, आयुर्वेदिक आरोग्य-दायी वस्तू आदींनी खच्चून भरला होता. या गाळेधारकांत इतर ज्ञातीयही सामील होते. यावर्षी हा मेळावा सकाळी दहा वाजल्यापासूनच दिवसभर चालू होता. प्रसिद्ध उद्योजिका मीनल मोहाडीकर प्रमुख अतिथी म्हणून आल्या होत्या. सौ. नीला विनय त्रिलोकेकर यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. अनेक उद्योजकांना प्रोत्साहन देणारा आणि महिला समाजाला श्रेयस ठरणारा हा आनंदमेळावा आनंददायी होता. त्यामुळे आनंदमेळाव्यात जाणे म्हणजे 'इये कौतुकाचिये नगरी' जाणे ठरले. अभिनंदन.

सर्व गाळ्यांचे परीक्षण सौ. उर्वशी धराधर यांनी केले आणि सौ. लीना रामणीकर यांना सर्वोत्कृष्ट गाळ्याचे बक्षिस अभिनेते महेश कोठारे यांच्या हस्ते देण्यात आले.

## प्रभुतरुणास देणगी

❁ श्री. राजन प्रधान यांजकडून कन्येच्या परीक्षेतील यशाप्रीत्यर्थ रू.१५१/-

❁ पाठारे प्रभु महिला समाजात विविध पदांवर कार्यरत राहून पन्नास वर्षे पूर्ण केल्याबद्दल सौ. वृंदा शाम जयकर यांजकडून रू. ५००/-

❁ कै. क्षमा यशवंत राणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री. भौतिक विनय राणे (बोरिवली) यांजकडून रु. ५००/-

## प्रभुतरुणाच्या वेबसाईटचे वर्गणीदार

श्री. जयदीप विजयकर
श्री. विशाल व्यवहारकर
सौ. मोनिका राणे-अय्यर
श्री. गौरांग कीर्तिकर
श्री. मनोहर विश्वनाथ अजिंक्य
श्री. स्वपन रंजन धैर्यवान
सौ. स्मिता विशाल व्यवहारकर
सौ. कश्मिरा स्वप्निल व्यवहारकर
श्री. नितीन बकुलचंद्र नवलकर
श्री. राजेश रसिक तळपदे
श्री. श्रेयस उल्हास राणे
कल्पना बिपीन तळपदे
शिल्पा जयकर
सौ. नीलिमा सुजन राणे

**सूचना**:- वेबसाईटचे वर्गणीदार झालेल्यांची नावे जर वरील यादीत नसतील किंवा त्यांना काही अडचणी येत असतील तर कृपया खालील इमेल आयडीवर संपर्क साधावा.
pp.prabhutarun@gmail.com

## परीक्षेतील सुयश

**एमेससी (अर्बन मॅनेजमेंट ॲण्ड डेव्हलपमेंट, आयएचएस, इरॅस्मिक विद्यापीठ, रॉटरडॅम, नेदरलँड)**

दिप्ती बिपीन तळपदे, प्रथम वर्ग

**तृतीय वर्ष बीकॉम**

रीमा राजन प्रधान, प्रथम वर्ग

## अभिनंदन

❁ फेब्रुवारी १९६२ साली पाठारे प्रभु महिला समाजात सदस्य म्हणून सौ. वृंदा शाम जयकर आल्या. तदनंतर कार्यवाह, उपाध्यक्ष आणि आता विद्यमान अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक पदे जबाबदारीने निभावली. आजही त्यांच्या अध्यक्षतेखाली महिलासमाज जोमाने वाटचाल करीत आहे. निरलस सेवाभाव हा वृंदाताईंचा स्थायीभाव आहे. कार्यवाह म्हणून कार्यरत असताना एकेकाळी त्या समारंभस्थळी साफसफाई करणे, रांगोळी स्पर्धेसाठी अंगण सारवणे यासारख्या कामांमध्येही पुढाकार घ्यायच्या. आजही त्या केवळ महिलावर्गाच नाही; तर समस्त प्रभुसमाजाला सामावून घेऊन संस्थेला परिपूर्ण शताब्दीकडे नेत आहेत. महिला समाजातील त्यांच्या कार्याला आज अविरत पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

❁ आयइएस शाळा (पूर्वीची किंग जॉर्ज शाळा) आणि रामनारायण रुईया महाविद्यालयाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाने या निमित्ताने स्मरणिका प्रकाशित केली. त्याचे संपादन मृदुला प्रभुराम जोशी (पूर्वाश्रमीच्या मृदुला गोविंदराव आगासकर) यांनी केले. महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाने ३ डिसेंबर रोजी लक्षणीय कार्य केलेल्या २३ जणांचा हृद्य सत्कार केला. आदि शंकराचार्यांची तसबीर आणि पुष्पगुच्छ असे ह्या सत्काराचे स्वरूप होते. या नेमक्या तेवीस जणात मृदुला जोशी यांचाही नेमका (योग्य) सत्कार झाला. आयइएस शाळेनेही अमृतमहोत्सवानिमित्त प्रत्येक दशकाची एक प्रतिनिधी अशा सहाजणी निवडून त्यांचा सन्मान केला. या सहाजणींमध्ये डॉ. मालती कारवारकर, आरती अंकलीकर-टिकेकर, पोलिस उपायुक्त रश्मी करंदीकर, ॲड. जाई वैद्य, दीपा तेली यांच्याबरोबरीने मृदुला जोशी होत्या. मानपत्र आणि भेटवस्तू देऊन झालेल्या या सन्मानांचे दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रक्षेपण केले गेले. मृदुला प्रभुराम जोशी यांचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन.

❁ कु. जुई हिमांशु आगासकर या सोलापूर येथे झालेल्या 'बॅडमिंटन चॅम्पियन' स्पर्धेत एकेरी, दुहेरी गटात विजेत्या ठरल्या. आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या चेन्नई येथील स्पर्धेतही त्यांनी भारताचे प्रतिनिधीत्व केले. अनेक ठिकाणी त्यांनी विजेतेपद आपल्याच 'नेट' मध्ये काबीज केले. त्यांच्या यशाचे 'नेट' वर्क असेच फैलावत जावो. अभिनंदन.

❁ श्री. वीरधवल दीपक तळपदे हे रोटरॅक्ट म्हणून नेपाळला युथ कॉन्फरन्सला जाऊन आले. अभिनंदन.


॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥ ॥ श्री गुरुदेव दत्त ॥

**प्रकाश्व कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम स्वाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा! विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबार इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो. खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह ॲंड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### आत्याबाई नाव बोला

अयाँश (हार्दिक) भूपेंद्र मनोहर अजिंक्य

### बाळा जोजो रे

| | | | |
|---|---|---|---|
| १५-१२-११ | सौ. शीतल आणि प्रसाद कोठारे, | पुत्र, | मालाड. |
| १७-१२-११ | सौ. मयुरा आणि गुंजारव विहंग नायक, | पुत्र, | मालाड. |

### नारळसाखर दिला

१७-१२-११ श्री. अन्वय रंजन देसाई कु. निवेदिता नीलेश विठोबा नायक

### नांदा सौख्यभरे

२७-११-११ श्री. मुकुल विजय त्रिलोकेकर, कु. दिप्ती बिपीन तळपदे
१८-१२-११ श्री. कल्पेश गिरीश वाझकर, कु. नमिता उल्हास नवलकर
१९-१२-११ श्री. राजेश रमेश तळपदे, कु. मोनाली सुबोध मानकर

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २४-११-११ | श्रीम. भावना (प्रमिला) श्रीकांत कोठारे, | वय ९०, | मुंबई |
| ०१-१२-११ | श्री. जयवंत आनंदराव तळपदे, | वय ७५, | |
| ५-१२-११ | श्री. गणपतराव नारायण धराधर, | वय ८०, | ठाणे |
| १०-१-१२ | श्री. शशीकांत श्रीधर विजयकर, | वय ६३, | कालिना |
| २५-१-१२ | श्री. दिपक भालचंद्र कोठारे | वय ६६ | अंधेरी |
| २८-१-१२ | श्री. गजानन माणिकराम नवलकर | वय ९१, | बोरिवली |
| ३०-१-१२ | श्रीम. शुभांगी केशव राणे | वय ७९ | |
| ३०-१-१२ | श्री. अनंत बाबुराव धैर्यवान | | |

(पान ५ कॉलम ४ वरून)

मस्त उपासाचा लाडू होतो किनई, तसंच दोन मने जुळली की छान मैत्री होते.' तिथे येऊन हे ऐकत असलेला बंटी लगेच म्हणाला, 'ती स्नेहलताई अने वसंतदादा यांचं पण असंच गूळपीठ आहे. दोघजणं गच्चीत घट्ट चिकटून उभी होती. मी पाहिलं, शप्पत!'

'हात् मेल्या!' आजी म्हणाली व ममाबरोबर हसू लागली. दाण्याचा लाडू 'मस्त' मी मात्र 'मेल्या' का? आजीचा धपाटा चुकवून पळताना, बंटीला प्रश्न पडलाच!

(संपर्क : २६१०४५५२)

### वर पाहिजे

उपवर वधूचे
वय : २८
उंची : ५-६ फूट
वर्ण : गहूवर्ण
शिक्षण : बी.कॉम, पी. जी.डी. बी. ए. (सिम्बॉयसिस)
नोकरी : मुंबईतील बीपीओमध्ये
वेतन : वार्षिक दोन लाख
संपर्क : ९८२३७२४०२८

(Contd. from page 4 col 4)

medium to perform his tricks. As always in such cases, the medium, on the first available opportunity, invariably tries to escape from the clutches of the Tantric by killing him unawares, and this is what precisely happened in the case of Naik! The medium did forcibly take Naik to seas against his wishes and drowned him! This is why I call it a murder! And more so this seems to be predated and planned as Naik himself had no vision beyond 31st December, 1999!

We stopped our conversation on the subject and went on for the dinner together. I am sure Suresh Sawant must not have slept that night due to heavy head and brain full of thoughts since he was the one most friendly with our Tantric friend!

(पान ३ कॉलम ४ वरून)

होती. नंतर दोन, तीन, चार मजली इमारती बांधल्या गेल्या. पण १९४२ साली भाडे नियंत्रण कायदा लागू केल्यानंतर बांधकामात गुंतवणूक करून, घर बांधून भाड्याने देणे घर मालकांना फायद्याचे ठरणारे नव्हते. त्यामुळे नवे बांधकाम फारसे झाले नाही. त्यामुळे व वाढत्या वस्तीमुळे घरांची टंचाई जाणवू लागली. आज गिरगाव, परळ, लालबाग भागात मोजकीच बैठी घरे उरली आहेत. त्यातील बहुसंख्य पुनर्विकास करणाऱ्या बिल्डरच्या शोधात आहेत.